# भाषा संचालनालय,
## विभागीय कार्यालय, पुणे
नवीन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, पुणे-४११००१.

दूरध्वनी क्रमांक :- ०२०-२६१२१७०९ ईमेल- bhashapune@gmail.com


**क्र.आस्था / मलप /२०२५ / पुणे / ९६२**

**दि . ३०.९.२०२५**

प्रति,
संबंधित कार्यालये

विषय :- भाषा संचालनालयामार्फत घेण्यात येणारी मराठी लघुलेखन परीक्षा- २०२५ परीक्षेची कार्यक्रमपत्रिका, आसन क्रमांक व वेळापत्रक इत्यादीची माहिती संबंधित कार्यालयांना पाठवण्याबाबत.

महोदय,

भाषा संचालनालयामार्फत घेण्यात येणारी ८० शब्द प्रति मिनिट गतीची मराठी लघुलेखन परीक्षा **शुक्रवार दि. १७ ऑक्टोबर २०२५** रोजी मुंबई, पुणे व नागपूर या केंद्रांवर सकाळी ठीक १०.३० वाजल्यापासून घेण्यात येणार आहे. या परीक्षेचे केंद्र, परीक्षाचालक-नि-ज्येष्ठ पर्यवेक्षकाचे नाव, पत्ता, दूरध्वनी क्रमांक व परीक्षेचे वेळापत्रक तसेच परीक्षेला बसणाऱ्या उमेदवारांसाठी सूचना इत्यादी माहिती पुढील कार्यवाहीसाठी सोबत पाठवण्यात येत आहे.

२. आपल्या कार्यालयातील ज्या कर्मचाऱ्यांना या परीक्षेस प्रवेश दिलेला आहे त्यांची नावे, आसन क्रमांक व परीक्षेचे वेळापत्रक यासंबंधीची माहिती सोबत जोडली आहे. आपल्या कार्यालयातील संबंधित कर्मचाऱ्यांना त्यांच्या परीक्षेचा दिनांक, आसन क्रमांक, वेळापत्रक याबाबतची अचूक माहिती तात्काळ देण्याची कृपया व्यवस्था करावी व सदर माहिती मिळाल्याबद्दल संबंधितांची स्वाक्षरी घ्यावी. परीक्षेचे वेळापत्रक परीक्षेपूर्वी किमान दोन दिवस अगोदर परीक्षा केंद्रावर लावण्याबद्दल संबंधित परीक्षाचालकांना यापूर्वीच सूचना देण्यात आल्या आहेत. आपल्या कार्यालयातील एखाद्या कर्मचाऱ्याची दरम्यानच्या काळात अन्य ठिकाणी बदली झाली असेल अगर एखादा कर्मचारी रजेवर गेला असेल तर परीक्षेची सर्व माहिती त्याला परीक्षेपूर्वी कळविण्याची व्यवस्था तात्काळ करावी व तसे केल्याचे या कार्यालयास उलटटपाली कळवावे.

३. या परीक्षेस बसणाऱ्या उमेदवारांना निश्चितपणे ओळखता यावे म्हणून भाषा संचालनालयामार्फत ओळखपत्राचा नमुना सोबत पाठविण्यात येत आहे. सदर ओळखपत्र संबंधित कर्मचाऱ्याकडून भरून घ्यावे व त्यावर आपल्या समक्ष त्यांची स्वाक्षरी घ्यावी. ओळखपत्रावर आपण अगर आपल्या हाताखालील एखाद्या जबाबदार अधिकाऱ्याने (असा अधिकारी राजपत्रित असावा) स्वाक्षरी करणे जरुरीचे आहे. सदर ओळखपत्र तसेच कार्यालयाने त्यांना दिलेले फोटो असलेले त्यांचे ओळखपत्रही (आयकार्ड) परीक्षाचालकांनी मागणी करताच त्यांनी दाखवणे आवश्यक आहे. ज्या उमेदवाराकडे त्यांचे छायाचित्र (फोटो) असलेले कार्यालयाने दिलेले ओळखपत्र नसेल त्याने परीक्षेच्या ओळखपत्रावर फोटो चिकटवून तो कार्यालय प्रमुखांमार्फत साक्षांकित करून घेणे आवश्यक आहे. फोटो असलेले ओळखपत्र नसल्यास अगर त्याने परीक्षेच्या ओळखपत्रावर फोटो चिकटवून तो साक्षांकित करुन घेतला नसल्यास त्यांना परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही याची संबंधित कर्मचाऱ्यांना जाणीव करुन द्यावी.

४. आपल्या कार्यालयातील परीक्षेस बसणाऱ्या एखाद्या कर्मचाऱ्याचे नाव त्याचे आवेदनपत्र विहित मुदतीत या कार्यालयाकडे पाठवूनही त्याला प्रवेश दिलेला नसेल तर अशा कर्मचाऱ्यास संबंधित परीक्षाचालकांना परीक्षा केंद्रावर भेटण्यासंबंधी सूचना द्याव्यात. एखाद्या परीक्षार्थ्याच्या नावात, कार्यालयाच्या पत्त्यात अगर यादीत काही त्रुटी आढळून आल्यास त्याबाबत परीक्षेपूर्वी या कार्यालयास तसे लेखी कळवावे.

कृ. मा. प.

५. आपल्या कार्यालयामार्फत नामनिर्देशित उमेदवारांस परीक्षेस उपस्थित राहण्याची सूचना द्यावी. पूर्व अनुमती न घेता परीक्षेला अनुपस्थित राहणाऱ्या कर्मचाऱ्याची त्या दिवसाची रजा विनावेतन करण्यात यावी.

६. परीक्षेस बसणाऱ्या उमेदवारांना परीक्षा प्रत्यक्ष सुरू होण्यापूर्वी १५ (पंधरा) मिनिटे अगोदर परीक्षा दालनात प्रवेश देण्यात येईल. चाचणी दाखल एखाद्या उताऱ्याचे श्रुतलेखनही देण्यात येईल व त्याकरता कर्मचाऱ्यांनी परीक्षेच्या वेळेपूर्वी १५ मिनिटे तरी परीक्षा दालनात उपस्थित राहणे आवश्यक आहे. तसेच परीक्षा सुरु झाल्यावर किमान अर्धा तास तरी त्याला परीक्षा दालन सोडता येणार नाही.

७. भाषा संचालनालयामार्फत मराठी लघुलेखनाची फक्त ८० शब्द प्रति मिनिट गतीची परीक्षा घेण्यात येते. या परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी किमान ५० गुण मिळवावे लागतात. मराठी लघुलेखन परीक्षेच्या गुणांकन पध्दतीच्या माहितीची प्रत यासोबत पाठविण्यात येत आहे. ती परीक्षेस बसणाऱ्या कर्मचाऱ्यांना कृपया द्यावी. **तसेच मराठी लघुलेखन परीक्षेच्या परीक्षार्थ्यांनी श्रुतलेखन संकेताकृतीमध्येच घेणे आवश्यक आहे. देवनागरी लिपीमध्ये मजकूर स्वरूपात श्रुतलेखन घेतल्यास संबंधित परीक्षार्थ्यांची उत्तरपत्रिका तपासली जाणार नाही अशा सूचना कृपया संबंधित परीक्षार्थ्यांना द्याव्यात व त्याबाबत त्यांची स्वाक्षरी घ्यावी.**

८ भाषा संचालनालयामार्फत घेण्यात येणारी मराठी लघुलेखन परीक्षा ही शासनातर्फे घेण्यात येणाऱ्या विभागीय परीक्षेसारखी असल्याने या परीक्षेला उपस्थित राहिलेल्या उमेदवारांचा परीक्षेचा कालावधी हा दोन संधींपुरता कर्तव्यार्थ समजावा. या परीक्षेसाठी त्यांना प्रवास करावा लागल्यास नियमानुसार पहिल्या दोन संधींसाठी त्यांना प्रवास खर्च अनुज्ञेय असेल.

९. कृपया या पत्रास सर्वप्राथम्य द्यावे व पत्राची पोच द्यावी, ही विनंती.

**आपला,**



**( श. कि. यादव )**
**सहायक भाषा संचालक,**
**भाषा संचालनालय, विभागीय कार्यालय,**
**पुणे.**

**सहपत्रे:**

१. परीक्षाचालक-नि-ज्येष्ठ पर्यवेक्षकाचे नाव, दूरध्वनी क्रमांक, केंद्राचा पत्ता व वेळापत्रक, इत्यादीचे विवरणपत्र.
२. उमेदवारांची यादी. (आसन क्रमांक)
३. ओळखपत्राचा नमुना.
४. उमेदवारांना सूचना पत्राची नमुना प्रत.

**भाषा संचालनालय, विभागीय कार्यालय, पुणे**

भाषा संचालनालय - मराठी लघुलेखन परीक्षा

केंद्र- पुणे　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　　दि. :- १७ ऑक्टोबर २०२५

| आसन क्रमांक | परीक्षार्थ्यांचे व नाव पदनाम | कार्यालय प्रमुखाचे नाव व पदनाम | शेरा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्रीमती गायकर तृप्ती सचिन | प्रबंधक,<br>कौटुंबिक न्यायालय,<br>सिटी सर्व्हे नं.३४ फायनल प्लॉट नं.८१६/१ जिल्हा व सत्र न्यायालय, पुणे च्या जवळ शिवाजीनगर , जि. पुणे-४११००५ | -- |
| २ | श्रीमती मदने सपना कुमार | -----//--- | --- |
| ३ | श्री. फसाले अतुल आप्पासाहेब | -----//--- | --- |
| ४ | श्रीमती पवार किर्ती उदय | दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,<br>व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,<br>नेहरू नगर, पिंपरी पुणे | --- |
| ५ | श्री. जाधव प्रविण भगवान | दिवाणी व फौजदारी न्यायालय,<br>पिंपरी चिंचवड, महानगरपालिका न्यायालय,<br>आकुर्डी जि. पुणे | -- |
| ६ | श्रीमती निकम प्रियांका मच्छिंद्र | सचिव<br>जिल्हा विधी सेवा प्राधिकरण ,<br>नवीन इमारत पहिला मजला, शिवाजीनगर,<br>जि. पुणे | -- |
| ७ | श्रीमती शेंगुळे ऋषिकेश कृष्णा | दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,<br>घोडेगांव ता. आंबेगाव जि. पुणे-४१२४०८ | --- |

**आपला,**

**( श. कि. यादव )**

**सहायक भाषा संचालक,**

**भाषा संचालनालय, विभागीय कार्यालय,**

**पुणे.**

**भाषा संचालनालयामार्फत - ८० शब्द प्रति मिनिट गतीची मराठी लघुलेखन परीक्षा शुक्रवार ऑक्टोबर २०२५**

**परीक्षेचे वेळापत्रक**

**परीक्षेचा दिनांक : शुक्रवार दि १७ ऑक्टोबर २०२५**

**परीक्षेची वेळ :- सकाळी १०.३० वाजल्यापासून**

परीक्षाचालक नि ज्येष्ठ पर्यवेक्षकांचे नाव, दुरध्वनी क्रमांक, परीक्षा केंद्राचा पत्ता तसेच
परीक्षेचे वेळापत्रक इत्यादीची माहिती दर्शविणारे विवरणपत्र

| अ. क्र. | केंद्र | परीक्षा केंद्राचा पूर्ण पत्ता | परीक्षाचालक नि ज्येष्ठ पर्यवेक्षकाचे नाव व कार्यालयाचा पत्ता दूरध्वनी क्रमांक | आसन क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १. | पुणे | मा.प्राचार्य,<br>नौरोसजी वाडीया महाविद्यालय,<br>आर्टस् इमारत , व्ही. के. जोग पथ, पुणे -४११००१ | श .कि. यादव<br>सहायक भाषा संचालक,<br>भाषा संचालनालय, विभागीय कार्यालय,<br>नवीन मध्यवर्ती इमारत, २ रा मजला, पुणे. ४११००१<br>भ्रमणध्वनी ८३५६०५४७१३ | **यादीतील सर्व उमेदवार** |

@@@@@@@@@@

सहायक भाषा संचालक,
भाषा संचालनालय,
विभागीय कार्यालय, पुणे.

नमुना क्र.०९

भाषा संचालनालय,

मराठी टंकलेखन / मराठी लघुलेखन परीक्षा

# **ओळखपत्र**

छायाचित्र

**श्री. /कुमारी /श्रीमती…………………………………………………………………………….……हे/या शासकीय कर्मचारी असून, खाली दर्शविल्याप्रमाणे त्यांनी आपली सही माझ्या समक्ष केली आहे. भाषा संचालनालयामार्फत घेण्यात येणाऱ्या मराठी टंकलेखन /लघुलेखन परीक्षेसाठी त्यांचा आसन क्रमांक………………………आहे.**

**----------------------**

**उमेदवाराची स्वाक्षरी**
**(उमेदवाराने आपल्या कार्यालय प्रमुखासमक्ष स्वाक्षरी करावी)**
**दिनांक:……………………**

**--------------------------------------**

**-----------------------------------------**
**(कार्यालयाचे नाव आणि कार्यालय प्रमुखाची स्वाक्षरी )**

**----------------------**

**उमेदवाराची स्वाक्षरी**
**(परीक्षा केंद्रावर पर्यवेक्षकाच्या समोर स्वाक्षरी करावी )**
**दिनांक:……………………**

**----------------------**

**पर्यवेक्षकाची सही**

**महत्त्वाची सूचना:- हे प्रमाणपत्र परीक्षेच्या काळात ज्या ज्या वेळी मागण्यात येईल त्या त्या वेळी दाखल केले पाहिजे .**

**(शा.म.मु.)एच २२६० (५,०००-२-२००३)**